वाचले –

१. आदेश क्र. प्रशा/१८/कावि/५१३/२०२० दिनांक २३/०७/२०२०

२. दिनांक ६ /११/२०२० रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८, कामगार कल्याण विभाग
जा.क्र. काक/२ /कावि/ 593/२०२०
दिनांक – ०६/१०/२०२०

विषय : - कोरोना विषाणू (कोव्हीड - १९) - कंत्राटी व मानधनावरील कामगार यांचे विशेष रजेबाबत....

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर वाढत असून सदर विषाणूच्या प्रतिबंधासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. सदर कोरोना विषाणूच्या प्रतिबंधासाठी महापालिकेतील सर्व अधिकारी / कर्मचारी / कंत्राटी / बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले / रोजंदारी / तदर्थ / मानसेवी / मानधनावरील नियुक्त केलेले कामगार अहोरात्र काम करीत आहेत. सदरचे काम करीत असताना महापालिकेचे अधिकारी / कर्मचारी तसेच इतर कामगार देखील कोरोना विषाणूने बाधीत होत आहेत. त्यामुळे संदर्भिय क्र. १ चे आदेशान्वये मनपाचे अधिकारी / कर्मचारी कोरोना विषाणूमुळे बाधीत झाल्यास संबंधीतांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्याचे दिनांकापासून १४ दिवसांची विशेष रजा मंजूर करणेत आली आहे. त्याचप्रमाणे कंत्राटी व मानधनावरील कामगारांबाबत संबंधीत विभागाकडून विचारणा होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या विविध विभागाकरीता सेवा देणारे कर्मचारी / कंत्राटी / बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले / रोजंदारी / तदर्थ / मानसेवी / मानधनावरील नियुक्त केलेले कामगार कोरोना विषाणूमुळे बाधीत झाल्यास संबंधीतांना विशेष रजा मंजूर करणे आवश्यक आहे.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकरीता सेवा देणारे कर्मचारी / कंत्राटी / बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले / रोजंदारी / तदर्थ / मानसेवी / मानधनावरील नियुक्त केलेले कामगार कोरोना विषाणूमुळे बाधीत झाल्यास संबंधीतांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्याचे दिवसापासून १४ दिवसांची विशेष पगारी रजा मंजूर करण्यास या आदेशान्वये मान्यता देत आहे.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रति – सर्व संबंधीत विभागप्रमुख